# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## शैक्षणिक प्रवेश विभाग

**विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना**

**एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. स्कॉलरशीप व फ्रिशिप नवीन व नुतनीकरण असणाऱ्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे**

मा. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या आदेशानुसार एस.सी/ विजाभज/इमाव/विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने सन २०१५—१६ स्कॉलरशीप व फ्रिशिप अर्ज भरावयाचे आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जाणार असल्याने समाजकल्याण विभागाने दिलेल्या मुदतीतच अर्ज भरण्यात यावे. सोबत समाजकल्याण विभागाने मान्य केलेल्या अभ्यासक्रमाची प्रवर्ग निहाय यादी तसेच अर्ज नुतनीकरण करणेबाबत सुचना व माहिती पुस्तिकेची प्रत परिपत्रक संदर्भ क्र. शैक्षणिक प्रवेश/३३५४ दिनांक ०६/०८/२०१५ अन्वये यापूर्वी संबंधित विभागांना कळविण्यात आलेले आहे.

**प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशीपसाठी करावयाच्या अर्जाबाबत :**

सन २०१५—१६ या शैक्षणिक वर्षापासून विविध अभ्यासक्रमास प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन ई—स्कॉलरशिप प्रणालीव्दारे अर्ज भरावयाचे आहेत. शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना खालील वेबसाईटवरून प्रथम User ID तयार करून Login करून अर्ज भरावेत.

http://mahaeschol.maharashtra.gov.in

वेबसाईटवरील अर्ज पुर्ण भरून त्याची एक प्रिंट काढून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबंधित विभागात अर्ज जमा करावेत. विभागाने प्रथम वर्षामध्ये शिकत असलेल्या प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती/फ्रिशीप याप्रमाणे वेगवेगळी करून Excel Format मध्ये भरून सीडी व हार्ड कॉपीसह शैक्षणिक प्रवेश विभागाकडे दि. १० नोव्हेंबर २०१५ पर्यंत पाठवावी.

**संबधित अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षामध्ये किंवा त्यापुढील वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती नुतनीकरणाबाबत :**

सन २०१५—१६ पासून समाज कल्याण विभागाने ज्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षासाठी शिष्यवृत्ती मंजुर केलेली आहे अशा संबधित अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षामध्ये किंवा त्यापुढील वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नव्याने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची आवश्यकता नाही अशा सूचना दिलेल्या आहेत.

त्यामुळे दुसऱ्या वर्षामध्ये किंवा त्यापुढील वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशीप चे अर्ज ऑनलाईन न भरता सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहिती आपल्या विभागाकडे सादर करावी व संबंधित विभागाने सदर माहिती प्रपत्रात भरून दि. १५ ऑक्टोबर २०१५ पर्यंत शैक्षणिक प्रवेश विभागात प्रत्यक्ष सादर करावी.

जे अभ्यासक्रम शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे अशा विभागातील विद्यार्थ्यांनी त्वरीत Online अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

ऑनलाईन पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरतांना विद्यार्थ्यांसोबत खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

०१. इयत्ता १० वी पासूनच्या सर्व गुणपत्रिका (पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी मधील परीक्षा क्रमांक व आसन क्रमांक टाकणे बंधनकारक आहे).

०२. स्वत:चे वैयक्तिक राष्ट्रीयकृत बॅकेतील विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक, बॅकेचा एमआयसीआर आणि आयएफएससी कोड नंबर झेरॉक्स प्रत.

०३. जातीचा दाखला.

०४. शाळा सोडल्याचा दाखला.

०५. तहसिलदाचा उत्पन्नाचा दाखला किंवा फॉर्म १६ ची झेरॉक्स प्रत

०६. आधार कार्डची झेरॉक्स प्रत (बॅकखाते क्रमांक आधार कार्डशी संलग्न करणे.).

०७. विभागात प्रवेश घेतलेल्या प्रवेश पत्राची झेरॉक्स

०८. २०१५—१६ या शैक्षणिक वर्षाच्या अगोदर पदव्युत्तर परिक्षा दिलेली असेल तर त्याबाबतच्या उल्लेख करावा व त्यासंबधी प्रमाणपत्र जोडावे.

०९. एखादया विद्यार्थ्याने चुकीच्या माहीतीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंखन करून शिष्यवृत्ती मिळवली असेल त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल व फी वसूल केली जाईल.

१०. बॅक खात्याबाबत काही चुकीची माहीती दिल्यास होणा—या आर्थिक नुकसानीस तो विद्यार्थी स्वत:च जबाबदार असेल यांची नोंद घ्यावी.

११. शैक्षणिक वर्षाच्या कालावधीमध्ये गॅप असेल तर त्यासंबधीचे प्रमाणपत्र सादर करावे.

जे विद्यार्थी वेळेत Online पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना स्कॉलरशीप व फ्रिशीप शासनाकडून मिळणार नाही. त्यामुळे होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. तसेच ज्या विद्यार्थ्यांची फी शासनाकडून परतावा होणार नाही किंवा संबधीत अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती योजना लागु नसल्यास अशा प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्या अभ्यासक्रमासाठी लागु असलेले संपूर्ण शुल्क भरणे बंधनकारक आहे. याची नोंद घ्यावी.

24/9/2015

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभा

गणेशखिंड पुणे — ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४९७५ }
दिनांक :२४/०९/२०१५ }

प्रत :मा. विभागप्रमुख,

आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात तसेच अर्जाच्या प्रती आवश्यक त्या कागदपत्रासह विहित मुदतीत या विभागाकडे सादर करण्यात यावे. समाजकल्याण विभागाने दिलेल्या सूचनेनुसार शिष्यवृत्तीसंदर्भात कार्यवाही व्हावी. त्याचप्रमाणे व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांची नुतनीकरणाची माहिती प्रपत्रात विहित मुदतीत या विभागास पाठवावी.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## नुतनीकरणाबात विभागाने भरून द्यावयाची माहिती

**विभागाचे नाव : —**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | मागील शिष्यवृत्ती भरलेली शैक्षणिक वर्ष | प्रवर्ग | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम मान्यता प्रकार | | योजना | | आधार क्रमांक | बँक खाते क्रमांक | जनरल रजिस्ट्रेशन क्रमांक | मागील परीक्षेचा निकाल उत्तीर्ण /अनुत्तीर्ण/ एटीकेटी | मागील परिक्षेची टककेवारी | विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची तारीख | विद्यार्थी वसतिगृहात राहतो किंवा नाही | विद्यार्थ्याने वसतिगृहात घेतलेली प्रवेशाची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनुदानित | विनाअनुदानित | शिष्यवृत्ती | फ्रिशीप | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

प्रत्येक अर्जाचे नुतनीकरण करण्यापूर्वी आपला अभ्यासक्रम अनुदानित किंवा विनाअनुदानित आहे. अभ्यासक्रम अधिकृत व मान्यताप्राप्त आहे. फी चे दर नियमाप्रमाणे आहेत. विद्यार्थी उत्तीर्ण झालेला आहे. विद्यार्थी वसतिगृहात राहत आहे. शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी पात्र आहे आणि आवश्यक त्या सर्व अटी व शर्ती यांची नियमानुसार पुर्तता केलेली आहे याची खात्री व पडताळणी करण्याची जबाबदारी विभागप्रमुखाची असेल. जर खात्री न करता शिष्यवृत्तीचे प्रस्ताव सादर केले गेल्यास विभागप्रमुख कार्यवाहीस पात्र ठरतील. कृपया विद्यार्थ्यांचे विभाग बदलेले असल्यास नुतनीकरण करू नये. मी येथे लिहून देतो की, वरील सर्व माहिती खरी असून ती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास याकरीता मी विभागप्रमुख म्हणून सर्वस्व जबाबदार असेन व कारवाईस पात्र राहीन.

विभागप्रमुखाची सही व शिक्का